अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, मुंबई यांचे अधिपत्याखालील लोहमार्ग, नागपूर विभाग यांच्या कार्यक्षेत्राचे विभाजन करुन नवीन पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, औरंगाबाद विभाग निर्माण करण्यास तसेच नवीन उपविभागीय पोलीस अधिकारी, लोहमार्ग अकोला उपविभाग निर्माण करण्यास मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः अेपीओ-३६१७/प्र.क्र.१०८/पोल-३
मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई
दिनांक : १० मे, २०१८.

<u>वाचा</u> :-

१) गृह विभाग शासन निर्णय क्रमांकः अेपीओ-३६०५/प्र.क्र.३ (अ)/पोल-३,दि.१७.०२.२००६.
२) गृह विभाग शासन निर्णय क्रमांकः अेपीओ-३१११/प्र.क्र.१०७(अ)/पु.बां.२/पोल-३, दि.०४.०३.२०१४.
३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२६-अ/४७/लोहमार्ग/पुनर्रचना/औट/अकोला/५१/२०१८, दि.०७.०३.२०१८.
४) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२६-अ/४७/लोहमार्ग/पुनर्रचना/औट/अकोला/५१/२०१८, दि.०८.०३.२०१८.

<u>प्रस्तावना</u> :-

महाराष्ट्र राज्यामध्ये इतर राज्यांतून येणाऱ्या प्रवाशांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून त्याप्रमाणे राज्याची लोकसंख्याही वाढत आहे. त्यामुळे रेल्वेमध्ये घडणाऱ्या गुन्ह्यांमध्ये तसेच कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नांमध्ये वाढ झालेली आहे. यास्तव अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, मुंबई यांचे अधिपत्याखालील पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, नागपूर विभाग यांना त्यांच्या अधिनस्त असलेल्या मोठ्या लोहमार्ग कार्यक्षेत्रावर अचुक नियंत्रण ठेवणे कठीण जात आहे. सदर लोहमार्ग कार्यक्षेत्रामध्ये घडणाऱ्या गुन्ह्यांवर चांगल्या प्रकारे नियंत्रण ठेवण्यासाठी व पर्यायाने प्रवासी व त्यांच्या मालमत्तेच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सध्या अस्तित्वात असलेल्या पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, नागपूर विभाग यांच्याकडील नाशिक व औरंगाबाद भाग वेगळा करुन पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, औरंगाबाद विभाग निर्माण करण्याचा तसेच पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, नागपूर अंतर्गत नवीन उपविभागीय अधिकारी, लोहमार्ग, अकोला उपविभाग निर्माण करणेबाबतचा प्रस्ताव अपर

पोलीस महासंचालक (नि. व स.), पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी उपरोक्त संदर्भाधिन क्र.०३ येथे नमूद दिनांक ०७.०३.२०१८ च्या पत्रान्वये सादर केला आहे. तसेच उक्त संदर्भाधिन क्र.०१ येथे नमूद दिनांक १७.०२.२००६ च्या शासन निर्णयान्वये संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक यांच्या आस्थापनेवर अपर पोलीस अधीक्षकांच्या मंजूर ०३ पदांपैकी ०१ पद वरीलप्रमाणे प्रस्तावित पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, औरंगाबाद विभागाकरीता स्थानांतरीत करण्यास व उपरोक्त संदर्भाधिन क्र.०२ येथे नमूद दिनांक ०४.०३.२०१४ अन्वये पोलीस प्रशिक्षण केंद्र, पांढरकवडा येथे उपलब्ध असलेल्या पोलीस उपअधीक्षकांच्या ११ पदांपैकी ०१ पद उपविभागीय अधिकारी, लोहमार्ग, अकोला उपविभागाकरीता स्थानांतरीत करण्याचे उक्त संदर्भाधिन क्र.०४ येथे नमूद दिनांक ०८.०३.२०१८ च्या पत्रान्वये प्रस्तावित केले आहे. उक्त प्रस्तावित कार्यालयांसाठी आवश्यक असणारे मनूष्यबळ पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, नागपूर यांच्या आस्थापनेवरुन उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्यानुसार अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, मुंबई यांचे अधिपत्याखालील लोहमार्ग, नागपूर विभागाचे विभाजन करुन नवीन पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, औरंगाबाद विभाग तसेच नवीन उपविभागीय पोलीस अधिकारी, लोहमार्ग, अकोला उपविभाग निर्माण करण्यास मान्यता देण्याची अपर पोलीस महासंचालक (नि. व स.) यांनी विनंती केली आहे. अपर पोलीस महासंचालक (नि. व स.), महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी उक्त पत्रांन्वये केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

<u>शासन निर्णय</u>:-

अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, मुंबई यांचे अधिपत्याखालील पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, नागपूर विभाग यांच्या कार्यक्षेत्राचे विभाजन करुन पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, औरंगाबाद विभाग निर्माण करण्यास तसेच पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, नागपूर यांच्या अधिनस्त नवीन उपविभागीय पोलीस अधिकारी, लोहमार्ग, अकोला उपविभाग निर्माण करण्यास मान्यता येत आहे.

२. उपरोक्त प्रमाणे नवनिर्मित पोलीस अधीक्षक लोहमार्ग, औरंगाबाद विभागामधील पोलीस अधीक्षक (वेतनश्रेणी : रु.१५६००-३९१००, ग्रेड पे ६६००) या पदाकरिता संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक यांच्या आस्थापनेवर उक्त संदर्भाधिन क्र.०१ येथे नमूद दिनांक १७.०२.२००६ च्या शासन निर्णयान्वये

समानवेतनश्रेणी असलेल्या अपर पोलीस अधीक्षक (वेतनश्रेणी : रु.१५६००-३९१००, ग्रेड पे ६६००) यांच्या ०३ मंजूर पदांपैकी ०१ पद स्थानांतरीत करण्यास तसेच पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, नागपूर यांच्या अंतर्गत नवनिर्मित उपविभागीय पोलीस अधिकारी, लोहमार्ग, अकोला उपविभागाकरीता उपरोक्त संदर्भाधिन क्र.०२ येथे नमूद दिनांक ०४.०३.२०१४ अन्वये पोलीस प्रशिक्षण केंद्र, पांढरकवडा येथे उपलब्ध असलेल्या पोलीस उपअधीक्षकांच्या ११ पदांपैकी ०१ पद स्थानांतरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, नागपूर यांच्या कार्यक्षेत्राचे विभाजन करुन उक्त पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, औरंगाबाद विभाग व उपविभागीय पोलीस अधिकारी, लोहमार्ग, अकोला उपविभागाची निर्मिती झाल्यानंतर पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, नागपूर विभाग व व पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, औरंगाबाद विभाग यांच्या अंतर्गत उपविभाग व पोलीस ठाण्यांची पुर्नमांडणी ही खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे असेल :-

पोलीस अधीक्षक, लोहमार्ग विभाग	**उपविभागीय पोलीस अधिकारी / पोलीस उप अधीक्षक**	**विभागामध्ये समाविष्ट पोलीस ठाणी**
पुणे	पुणे उपविभाग	पुणे, दौंड, अहमदनगर
	सोलापूर उपविभाग	सोलापूर, कुर्डुवाडी, मिरज
नागपूर	नागपूर उपविभाग	गोंदिया, इतवारी, नागपूर
	अकोला उपविभाग (नवनिर्मित उपविभाग)	**अकोला, वर्धा, बडनेरा**
औरंगाबाद (नवनिर्मित विभाग)	मनमाड उपविभाग	शेगांव, भुसावळ, चाळीसगांव, मनमाड, नंदूरबार, नाशिक रोड, इगतपूरी
	जालना उपविभाग	औरंगाबाद, नांदेड, परळी वैजनाथ

३. उपरोक्त नवनिर्मित पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, औरंगाबाद विभाग व उपविभागीय पोलीस अधिकारी, लोहमार्ग, अकोला उपविभागाकरीता आवश्यक असलेले मनुष्यबळ व साधनसामग्री पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, नागपूर विभाग यांच्या आस्थापनेवर उपलब्ध असलेल्या मनुष्यबळातून व साधनसामग्रीतून पुरविण्यात यावे.

४. सदर शासन निर्णय वित्त विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४१/अर्थ-१, दि.०२.०६.२०१५ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५१०१८०४३६९३२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kailas A. Gaikwad

Digitally signed by Kailas A. Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b31abfcb1894c4c597cc944f19a89f474e7b98a708cc03eb46cd241a604d42bb, cn=Kailas A. Gaikwad
Date: 2018.05.10 18:03:13 +05'30'

(कैलास गायकवाड)
उप सचिव, गृह विभाग

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
२. मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधान परिषद/विधानसभा.
३. मा.राज्यमंत्री,गृह (शहरे) यांचे खाजगी सचिव.
४. मा.राज्यमंत्री,गृह (ग्रामीण) यांचे खाजगी सचिव.
५. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. पोलीस आयुक्त, लोहमार्ग, मुंबई.
१०.पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर.
११. संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
१२. जिल्हाधिकारी, नागपूर/औरंगाबाद/अकोला.
१३. पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, नागपूर/पुणे.
१४. पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रामीण/अकोला.
१५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१६. जिल्हा कोषागार अधिकारी, नाशिक/यवतमाळ/औरंगाबाद/अकोला.
१७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, वांद्रे, मुंबई.
१८. वित्त विभाग, कार्यासन व्यय-७/ वित्तीय सुधारणा-१.
१९. निवड नस्ती, पोल-३.